# दलित पँथर आणि कलेतील हस्तक्षेप

**डॉ सुनील अभिमान अवचार** मराठी विभाग,मुंबई विद्यापीठ,मुंबई

---

दलित पँथर सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यानिमित्ताने दलित पँथरची सर्वदूर विविध अंगाने चर्चा होणार आहे. पँथरची चळवळ आजही मेलेली नाही.किंबहुना कोणतीही चळवळ कधीही मरत नसते. पँथरने सुरवातीच्या काळात संघर्षाच्या माध्यमातून समाज आणि राजकारणामध्ये दखल घेण्याइतपत बदल घडवून आणला होता. वर्ण - वर्ग - लिंगभेद मुक्तीच्या लढ्यातील अत्यंत महत्त्वाची संघटना म्हणून, शोषित, सर्वहारा वर्गाचा प्रतिकार म्हणून तिच्याकडे पाहिले गेले. दलित पँथरने सुरवातीपासूनच साहित्य आणि कला क्षेत्रावर प्रभाव टाकला आहे. आज याचे मूल्यमापन आपल्याला करता येऊ शकते. ६० च्या दशकात दलित साहित्यामध्ये विद्रोहाचा स्वर जो जोरकसपणे व्यक्त झालात्या मागे खचितच दलित पँथर होती यात शंका नाही. पँथरच्या डोळ्यातील धगधगती आग घेवूनच दलित साहित्य चळवळीतील कवी - लेखक - रस्त्यावरच्या आंदोलनातही उतरले होते. त्यात राजा ढाले, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार , अर्जुन डांगळे , महातेकर,अरुण कांबळे हे आघाडीवर होते. एका बाजूला आंदोलन तर दुसऱ्या बाजूला लेखन करीत होते.

"ती पहारे ती पहा मातीची अस्मिता आभाळ भर झाली
माझ्याही आत्म्याने झिंदाबादची घोषणा केली."

ही विद्रोहाची घोषणा कवितेत आणि कलेतूनही दिसून येते. अमेरिकेत निग्रोंच्या चळवळी मधून ज्याप्रमाणे कवी, कलावंत आणि चित्रकार निर्माण झाले, त्याच पद्धतीने मराठी साहित्य-कलाविश्वात दलित पँथरचाही मोठा प्रभाव पडल्याचे दिसते. विद्रोही काव्यभाषेचा ज्याप्रकारे पँथर चळवळीतील कवींनी आविष्कार केला,तश्याच रीतीने एका नव्या चित्रभाषेचा आविष्कार दलित चित्रकारांनी केला आहे. तो नेमका कसा? यावर प्रकाश टाकण्याचा प्रस्तुत लेखात केला आहे.

राजा ढाले आणि नामदेव ढसाळ दलित पँथर चळवळीमधील महत्त्वाचे लेखक जसे होते तसेच ते चित्रकार आणि कलासमीक्षक, चिकित्सकही होते. राजा ढाले यांना लघुनियतकलिकाच्या चळवळीची पार्श्वभूमी लाभली होती. त्यांचे हस्ताक्षरही कलात्मक(कॅलीग्राफीकल) होते. त्यांनी लिहिलेला 'बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीतून जाती आणि कला' हा लेख आणिअस्मितादर्श साहित्यमेळाव्याच्या निमित्ताने त्यांनी दिलेले भाषण अभ्यासले असता त्यांचा दलितांच्या कला आणि साहित्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन दिसतो. आपल्या लेखात ते म्हणतात "ह्या ज्या कला आहेत, त्या शुद्रांच्या आहेत. त्या शुद्रांच्या आहेत असं म्हटलं जाई. महाराष्ट्रातील ९० टक्के लेणी खोदणारे लोक जर कोण असतील तर ज्यांनी बुद्धाच्या धर्मावर फणा धरला ते नाग लोक होते. त्यांनी लेण्या कोरल्या. विषमता हा धर्म झाला आहे. विषमतेच्या विचारांनी जातीशी कला बांधून टाकली. चांभारांनी चपला, कुंभारांनी मडकी घडवावी अशी त-हा. या 'फिल्ड वर्क' मधूनच कलांचा उदय झाला. मनुस्मृतीत ६४ कला शूद्रांच्या कला आहेत असं, म्हटलं आहे. आमचा कलावंत शुद्र आहे की नाहीहे महत्वाचं नाही. पण त्याची कला मात्र संस्कृती म्हणविणा-यांनी शुद्र ठरविली आहे. बौद्ध काळात ह्या सर्व कला वाढल्या कारण बुद्धाच्या रूपाने हा विचार आला होता. येथील नाग संस्कृती ही महान संस्कृती असल्याचे जर्मनांनी म्हटले आहे. " दगड सुद्धा बोलू शकतात परदेशी विचारवंतांशी " अशी स्थिती लेण्यांची आहे. मद्रास व दक्षिणेकडील सनईला 'नागस्वर' म्हटलं जातं. कारण ही नागांची वाद्ये आहेत. दुसरे सारंगी वाद्य. ही वाद्ये मागे पडली तरी आजही अस्तित्वात आहेत. एक रावण वाद्य आहे. रावण नाग वंशाचा म्हणून त्याची कला शुद्र ठरवली. पाणिनी सारखा व्याकरणकार शुद्र वंशाचाच होता. ही संस्कृती संपन्न होती. जिच्याकडे कला जतन करण्याचा वारसा होता. सनई, डफ वाजविणारे, चर्मवाद्य, तंतुवाद्य बनविणारे किंवा फुंकून वाजविण्यात येणारी वाद्य बनविणारे विशिष्ट समाजाचे, संस्कृतीचे होते. त्यामुळे त्यांच्यावर सांस्कृतिक आघात झालेला आहे." या सर्वच कलांवर दलितांचा हक्क असल्याचे राजा ढाले सांगताना दिसतात. त्याचबरोबर बाबसाहेब आंबेडकरांच्या दृष्टीतून जाती आणि कला या लेखात डॉ. आंबेडकरांच्या कला विचारांचा त्यांनी वेध घेतला आहे. भारतात जातीमुळे कलेचेखूप मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.राजा ढाले यांनी धनंजय कीर यांच्या ' DrAmbedkar life and mission ' या ग्रंथामधून ' जाती आणि कला ' विषयीचे मत उधृत केले आहे. ( He complained that in India appreciation of art was confined to casteism. A man must be born into a caste which followed a certain art. Art suffered,he observed, because man could not follow his) भारतात कलेची पारख जातीआधारीत असल्याची त्यांची तक्रार होती. जन्मानेच एखाद्याला त्या जातीची कला प्राप्त होत असे. माणसाच्या स्वाभाविक कलेला तिचे नाव असल्यामुळेच कलेला अवकळा प्राप्त झाली असे त्यांचे मत होते. भारतीय कलेविषयी डॉ. आंबेडकरांनी १९४० मध्ये एका मुलाखतीप्रकटद्वारे आपले विचार प्रकट केले होते.जातीप्रथेची बंधने वाढली तेव्हा कलेचा दर्जा निकृष्ट आणि जातीप्रथेचे बंधने सैल झाली तेव्हा कलेचा दर्जा उत्कृष्ट झाला आहे.अजिठा,चित्रकला , शिल्प कलेचे उदाहरण राजा ढाले देतांना दिसतात. पुढे राजा ढाले म्हणतात," डॉ. आंबेडकरांचे म्हणणे तंतोतंत खरे असल्याचा प्रत्यय

आपल्याला अजिंठ्यात उमटलेल्या लयदार रेषेवरून आणि सुंदर घाटावरून येईल. अजिंठ्यातील चित्रकला आणि शिल्पकला ही मूळची बौद्धांची प्रेरणा असून त्यामधील बहुतांश भाग हा बौद्धयुगात आकारास आला. म्हणजेच जातीची बंधने सैल झाली तेव्हाच भारतीय कलांचा उत्कर्ष झाला आणि जेव्हा ती कठोर झाली तेव्हा कलेचा आविष्कार लुप्त झाला." कलांची निर्मिती, त्यांच्या दर्जा संदर्भात राजा ढालेंचे हे आकलन महत्त्वाचे असून 'जात' कलेला कशी प्रभावित करते. या अनुषंगाने त्यांनी कला इतिहासावर प्रकाश टाकून हे तथ्य अधिक स्पष्ट केले आहे. राजा ढाले यांनी काही ग्रंथांचे मुखपृष्ठआणि रेखाटनेही काढली आहेत. भाऊ पाध्ये यांचे नाटक 'ऑपरेशन छक्का ' व कवी. ज.वि.पवार यांचा कवितासंग्रह 'नाकेबंदी' चे मुखपृष्ठ, चंद्रकांत खोत यांच्या मार्मिक कवितासंग्रहाच्या मुखपृष्ठावरील व्यक्तिचित्र रेखाटन, कार्ले येथील लेण्यात कोरलेल्या नाग कन्येचे रेखाटन, कार्ले येथीलच चैत्यगृहात कोरलेल्या राजघराण्यातील नागदाम्पत्यांचे रेखाचित्र,चित्रकार प्रदीप नेरूरकर यांचे रेखाटन (१९६९),अशोक शहाणे, भाऊ पाध्ये, वसंत गुर्जर यांची रेखाटने ललित दिवाळी १९६८ मधील काही व्यंगचित्रे, मर्तीक कवितासंग्रह, १९६६ मधील मजनू इंदोरी यांचा ' जिंदगीचे गीत 'चे मुखपृष्ठ, बहिष्कृत भारतातील अग्रलेख १८७६मुखपृष्ठ, अंजिठा भित्तीचित्राची प्रतिकृती, धम्मलीपीचे मुखपृष्ठ, १९८९ चित्रकलेविषयी इतर लेखन , ओयासिस ,चक्रवर्ती, ३ मे१९६८ मधील दै. नवाकाळ (१९७७) प्रा. वडणगेकर लवाटेयांच्या चित्रासंबंधीचे लेखन,प्रा.प्रमोद रामटेके यांच्या धम्मलिपी(६ डिसेंबर १९८७) वरील डॉ आंबेडकर पोर्ट्रेट विषयीचे लेखन ढाले यांचे हे सर्वच लेखन पर्यायी कलाव्यवहाराला बळकटी प्राप्त करून देणारे आहे.

नामदेव ढसाळ यांची पँथर कवी म्हणून सर्वदूर ओळख आहे, पण ते चित्रकारही होते याकडे जास्त लक्ष दिले गेले नाही. ढसाळ यांची एक उत्तम चित्रकार म्हणून नोंद घेणे आवश्यक आहे. नामदेव ढसाळ यांनी 'गोलपीठा' या काव्यसंग्राहाचे मुखपृष्ठ स्वतः काढले आहे. याशिवाय काही रेखाचित्रही त्यांनी काढली आहेत.'गोलपिठा' काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठाच्या निर्मितीविषयी त्यांनी अ. ब. क. ड. ई. दिवाळी अंक -८४ च्या अंकात सांगितले आहे "गोलपीठाच्या मुखपृष्ठाची मला कल्पना सुचली. मी मुखपृष्ठ केलं एक बाई पाठमोरी नागडी झोपलेली आहे.तिच्यातनं एक झाड उगवलेलं आहे. त्याच्यावर एका माणसाची कवटी लावलेली आहे.त्याच्या खाली मी हा ' व्हानररी डिसीज' चा फॉर्म टाकला. आता या सर्वांचं सांस्कृतिक मूल्यमापन करायचं ठरलं तर अवघड आहे.आणि हे या सर्व प्रस्थापित व्यवस्थेमध्ये कुठल्या संज्ञात बसवून ठेवता येईल?" हा प्रश्न स्वतःच्याच चित्राविषयी त्यांनी विचारला आहे. प्रस्थापित व्यवस्थेच्या कुठल्या संज्ञेत ही चित्रं बसणार नाहीत त्यांचे वेगळे मूल्यमापन करण्याची गरज ढसाळ यांनी प्रतिपादन केली आहे.ढसाळ यांनी कवितेची वेगळी काव्यभाषा दिली.त्याचबरोबर वेगळी चित्रभाषा निर्माण करण्याचाही प्रयत्न केला आहे.आतापर्यंत जे मराठी पुस्तकाच्या कव्हरवर जे चित्र साकारले जात होते ते घोटीव चाकोरी बंध असेच होते. ढसाळांनीवेगळा प्रयोग केला आहे.त्या नंतर सबंध दलित साहित्यातील पुस्तकांच्या मुखपृष्ठांची परंपराच बदलून गेलेली दिसते.' अस्मितादर्श' मासिका मधून तर विविधतेने नटलेला कला आविष्कार पाहायला मिळतो. भाऊ समर्थ, भ.मा. परसाळे ,श्रीधर अंभोरे, दासू भगत,बळी खैरे, राजानंद सुरडकर, सुनील अवचार आदीं पर्यंतची उदाहरणे पाहता हे आपल्या लक्षात येईल. या सर्वांच्याच कला आविष्काराचा स्वतंत्रपणे अभ्यास होण्याची गरज आहे. दलित पँथर चळवळीने कलांवर नेमकाकाय परिणाम केला? तर मी म्हणेन की पर्यायी सांस्कृतिक राजकारणाच्या दृष्टीने केलेच्या जगत एकस्वतंत्र पायवाट निर्माण करण्याचा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. तो कलेच्या मध्यप्रवाहाला धक्का देणारा आहे. साहित्यात ज्या प्रमाणे गावकुसाबाहेरचे बहिष्कृत जग मांडले गेले नव्हते किंवा चित्रित झाले नव्हते आणि कोणालाही वाटले नव्हते हे जीवन मांडले पाहिजे पण दलित साहित्यिकांनी ते मांडले त्याचप्रमाणे प्रस्थापित चित्रकारांनाही कधी वाटले नाही की हे ब्रोकन मॅन चे जीवन महत्वाचेआहे, त्यांचे अनुभव महत्वाचे आहेत त्या अनुभवांना दलित चित्रकारांनी रंग रेषांमधून आकार द्यायला सुरवात केली आहे. ही एक ऐतिहासिक सांस्कृतिक घटना म्हणावी लागेल. सौंदर्याच्या ब्राम्हणी आरशाला ब्रेक करणारा, कलेला नवा आशय नवा विषय नवी अभिव्यक्ती देणारा हा हस्तक्षेप आहेअसे मला वाटते. म्हणूनच या विषयाची वेगवेगळ्या पद्धतीने चर्चा होणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची

1.पानतावणे गंगाधर(संपा.) अस्मितादर्श, मार्च -एप्रिल ,1977,पृ. क्र.21-22

2.आठवले इंदिरा इतर,(संपा), राजा ढाले :समग्र लेखन, खंड1 ,राजा ढाले सांस्कृतिक प्रतिष्ठान,1990,,पृ. क्र.283

3.ढसाळ नामदेव, अ ब क ड ई , दिवाळी 1984 ,पृ. क्र. 83